Thursday, January 09, 2025
10:58 AM

## अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक ०९/०१/२०२५

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटनास्थळ | गु. घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नांव व पत्ता | चोरी गेला माल/मिळाला माल /पिडीताचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २०/२०२५ कलम ३०९(४), ३५१(३) BNS | मंगलधाम जवळील टेकडीवर अमरावती | दि. ०३/०१/२०२५ चे १५.३० वा दरम्याण<br><br>दि.०८/०१/२०२५ चे १८.३१ वा | प्रदिप उर्फ मयुरेश नंथुजी खंडारे वय ३५ वर्ष रा कपीलवस्तु नगर गल्ली नं ५ अमरावती ह मु मोती नगर पंजावराव रोहनकर यांचे घरी भाड्याने अमरावती | .कृष्णा सुर्यवंशी | व्हिवो कंपनीचा मॉडल क्र वाय ३३ टी मोबाईल किं अं ५०००/-रु चा सेकंड हॅन्ड घेतलेला व फि ची मोपेड गाडी क्र एम एच २७ डि जी ७४१३ एक्सेस कंपनीची किं अं ८०,०००/-रु | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी हे आरोपीस ओळखत असुन दि.०३.०१.२०२५ रोजी माया चव्हाण व आरोपी कृष्णा सुर्यवंशी यांनी खुप दिवस झाले भेटलो नाही म्हणुन भेटायचे ठरवले होते म्हणुन फिर्यादी त्यांची मोपेड क्र एम एच २७ डि जी ७४१३ एक्सेस गाडी ने फर्शी स्टॉप येथे कृष्णा सुर्यवंशी,माया चव्हाण व त्याचे २ मित्र असे भेटले त्यांच्यात चर्चा झाली व त्यानंतर माया चव्हाण व त्याचे दोन मित्र तेथुन निघुन गेले त्यावेळी आरोपीने फिर्यादीची गाडी स्वत चालवायला घेतली व मंगलधाम जवळील टेकडी वर घेवुन गेला तेथे पांढ-या रंगाच्या ओट्यावर बसले त्यावेळी आरोपीने त्याचेजवळील चाकुचा धाक दाखवुन फि जवळील व्हिवो कंपनीचा मॉडल क्र वाय ३३ टी मोबाईल किं अं ५०००/-रु चा सेकंड हॅन्ड घेतलेला व फि ची मोपेड गाडी क्र एम एच २७ डि जी ७४१३ एक्सेस कंपनीची किं अं ८०,०००/-रु असे जबरीने हिसकावुन घेतले व पोलीस स्टेशनला गेल्यास चाकुने मारेल अशी धमकी दिली त्याच्या भितीमुळे फि ने आज रोजी पो स्टे ला रिपोर्ट दिली करीता गुन्हा दाखल |
| २ | पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती अप क्र २५/२०२५ कलम ३०४(२) बी एन एस | इच्छापुर्ती हनुमान मंदीर जवळ अनंत विहार जवळ केवल कॉलनी अमरावती | दि.०८.०१.२०२५ चे १५.३० वा<br><br>दाखल दि.०८.०१.२५ चे १८.३७ वा. | एक महिला | दोन अज्ञात मोटार सायकल स्वार | मनी डोरल्याची सोन्याची पोत वजन अं ६ ग्रॅम कि अं १५०००/- रु | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही किराणा दुकानात सामान घेणे करिता जात असतांना नमूद दोन अज्ञात इसम मोटर सायकल वर आले फि जवळ मो सा आणुन मागे बसलेल्या इसमाने फिर्यादीचे गळयातील मनी डोरल्याची सोन्याची पोत वजन अं ६ ग्रॅम कि अं १५०००/- रु ची गळयातुन ओढुन हिसकावुन पळुन गेले.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटनास्थळ | गु. घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नांव व पत्ता | चोरी गेला माल/मिळाला माल /पिडीताचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | पो स्टे फ्रेजरपुरा अप क्र २२/२०२५ कलम ३०३(२) BNS | महालक्ष्मी टॉवर मंगलधाम परिसर हायवेजवळ अमरावती | दि.३१/१२/२०२४ चे १७.०० वा ते दि.०६/०१/२०२५ चे १७.०० वा दरम्याण<br><br>दि.०८/०१/२०२५ चे २१.४९ वा | प्रशांत अरुणराव तायडे वय २८ वर्ष रा डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळयाजवळ राहुल नगर अमरावती | अज्ञात | २२ बॉट-या जुन्या वापरत्या किं अं ५००००/-रु च्या | हकीकत अशा प्रकारे आहे की.यातील फिर्यादी हे टेक्नीशियन चे काम करीत असुन दि.३०/१२/२०२४ चे सायंकाळी ०५.०० वा ATC मोबाईल टॉवर महालक्ष्मी कॉलनी मंगलधाम येथे हायवेजळील ATC टॉवर येथील मिटर रिडींग घेण्यासाठी गेले होते तेथे टॉवर चय खाली खुल्या जागेत चार्जिग करीता लावलेल्या २४ बॅट-या लॉट क्र TIPLMU७३९७८५ या बॅट-या लोखंडी कपाटात ठेवल्या होत्या. दि.०६/०१/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वा दरम्याण फि व सोबत महेन्द्र पवार व भुषण बारेकर असे मोबाईल टॉवरजवळ गेले असता टॉवर खालील खुल्या जागी लोखंडी कपाटात ठेवलेल्या २४ बॅटरी पैकी २२ बॉट-या जुन्या वापरत्या किं अं ५००००/-रु च्या दिसल्या नाही त्या कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरल्या अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ४ | बडनेरा अप क्र. ०८/२५ कलम ३०३(२)भा न्या स | राजेन्द्र तुकारामजी तांबे यांचे शेतशिवार भानखेडा | दि.०७/०१/२५ चे १२/०० ते दि.०८/०१/२५ चे ०६/०० दा ता वेळ- दि.०८/०१/२५ चे १४/१४ वा | दिंगाबर मनोहरराव राऊत वय-४१ वर्ष रा-गुरूकुंज मोझरी ता.तिवसा जि अम | अज्ञात | कामाच्या साईडवरील एकुण २६ लोखंडी चॅनल वजन ७८० कि लो एकुण २६,०००/-रु | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि.०७/०१/२५रोजी चे रात्री १२.०० वा ते दि.०८/०१/२५ रोजी चे सकाळी ०६/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरटयांनी माझे कामाच्या साईडवरील एकुण २६ लोखंडी चॅनल वजन ७८० किलो एकुण २६,०००/-रु चोरुन नेले आहे अशा फि चे जबानी रि पोंटवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| ५ | पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती अप क्र २४/२०२५ कलम ३०६ बी एन एस | अभियंता कॉलनी विद्युत नगर अमरावती | दि. १८.१२.२०२४ ते ०६.०१.२०२५ दाखल दि. ०८.०१.२५ चे १८.१० वा. | एम महिला | एक महिला | नगदी ५०००० रु व सोन्याची अंगठी वजन ३.५० ग्रॅम कि अं २५०००/-एकुण कि.७५०००/- रु. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील आरोपी हे फि चे घरी मोलकरिन म्हणुन मागील दोन महिण्यापासुन कामाला आहे .यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे मुलाने दि.१८.१२.२४ ला बॅंकतुन नगदी ५०००० रु कामाकरिता आणले होते कपाटामध्ये ठेवले होते त्यांनी बधितले असता ते दिसुन आले नाही तसेच मुलीने ३१.१२.२४ ला तिच्या बेडरुम मध्ये ड्रेसिग बॉक्स वर सोन्याची अंगठी वजन ३.५० ग्रॅम कि अं २५०००/- ची काढुन ठेवली होती दि.०६.०१.२०२५ रोजी आरोपी ही मुलाचे व मुलीची बेडरुम सफाईकरिता गेली असतांना तिने चोरी केली असा फिर्यादीचा दाट संशय आहे.अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता व संपर्क क्र. | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| ७ | वलगाव अप क्र. 07/2025 कलम 281, 125(अ) बि.एन.एस.प्रमाणे दाखल. | दि.08/01/2025 चे 10/30 वा. दादि.08/01/25 चे 13/32 वा. | मोहन नंदकिशोर कलत्री वय 54 वर्ष धंदा – व्यापर रा. मेन वलगाव ता.जि. अमरावती. | चारचाकी ट्रक क्र.एम.एच 04 ई.एल- 9054 चा चालक | हकिकत अशा प्रकारे आहे कि, आज दि.08/01/2025 रोजी सकाळी 10/30 वा.दरम्यान मी माझ्या चारचाकी टोयोटा ग्लॉन्झा पांढ-या रंगाची क्र.एम.एच 27 डी.यु 3033 या गाडीने वलगाव कडुन अमरावती कडे जात असतांनी माझी पत्नी ही माझ्या गाडीत बसलेली होती. व माझी गाडी चालवीत असतांना कामुंजा फाट्यावर असतांना माझ्या मागुन चारचाकी डबल टायर असलेला ट्रक कंथीया रंगाचा टाटा कंपनी चा क्रमांक एम.एच 04 ई.एल 9054 चा चालक माझी चारचाकी चे मागुन वलगाव कडुन भरधाव वेगावे व निष्काळजी पने चालवीत आला. आणी कामुंजा फाट्यावर माझ्या चारचाकीस मागुन ठोस मारुन त्याने रोड अपघात घडवुन आणला रोड अपघाता मध्ये माझ्या दोन्ही पायाच्या टोंगळ्या जवळ मार लागला तेव्हा कामुंजा फाट्यावर किरण अण्णाजी ईंगळे वय 46 वर्ष रा. हनुमान चौक वलगाव हा हजर होता. त्यांचे सोबत मी पोलीस स्टेशन वलगाव येथे ट्रक क्र.एम.एच 04 ई.एल-9054 च्या चालकाचा रिपोर्ट देण्यास आलो.तरी रोड अपघात घडवुन आणुन मला रोड अपघातात दुखापत पोह्चवना-या चारचाकी मागीली डबल टायर क्र.एम.एच 04 ई.एल.9054 च्या चालकावर कायदेशीर कारवाई व्हावि करीता मी रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन सदर चा गुन्हा दाखल |

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटनास्थळ | गु. घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नांव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती अप क्र २०/२०२५ कलम ४/२५ आर्म अॅक्ट | शाहुबाग मैदान अमरावती | दि. ०७.०१.२५ चे २२.३० वा. दाखल दि. ०८.०१.२५ चे ००.५४ वा. | पोहेकॉ भारत श्रावण वानखडे, ब नं १०५, पोस्टे गाडगेनगर अमरावती शहर | निकु उर्फ निखील राजु गायकवाड, वय २१ वर्प रा. महेंद्र कॉलनी शोभा नगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडून खबर मिळाली की, यातील आरोपी नामे निकु उर्फ निखील गायकवाड महेंद्र कालनी शोभा नगर गल्ली नं ३ अमरावती हा शाहुबागचे मैदानात हातात चाकु घेवून लोकांमध्ये दहशत निर्माण होईल या उद्देशाने उभा आहे. अशा माहितीवरुन फिर्यादी यांनी पोस्टे स्टाफ सह सदर आरोपीवर रोडचे बाजुला मो सा उभे करुन दुरुन पाहिले असता असता एक ईसम सार्वजनिक ठिकाणी हातामध्ये लोखंडी चाकु घेवून लोकांमध्ये दहशत निर्माण होईल असे कृत्य करीता असतांना दिसला वरुन त्यास ताब्यात घेवून त्याचे ताब्यातून एक धारदार लोखंडी चाकु ज्याचे पाते ९ इंच पात्याची रुदी १.५ इंच व लाकडी मुठ ४.५ इंच एकुण लांबी १३.५ इंच लांबीची किं अं. लांबीचा किं अं २००/- रु चा मिळून आल्याने आरोपी विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल |
| ९ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र. २१/२५ कलम २९६, ११५(२), ३५१(२) ३५२ भान्यंसं | वेलकम टी पॉईंट अमरावती | दि. ०८.०१.२५ चे ०२.३० वा. दाखल दि. ०८.०१.२५ चे ०६.२१ वा. | सार्थक विजय अमदरे वय २४ रा असराणी ले आऊट मोर्शी ता जि अमरावती | अमर ओमप्रकाश शिरभाते वय ३९ रा. कल्याण नगर गल्ली नं १ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातीलनमुद घटना ता वेळी वठिकाणी फिर्यादी व त्यांचा मावस भाऊ असे गाडी क्र एमएच २७बीई-३४१४ ने वेलकम टी पॉइंट कडे निघाले असता मागुन महेंद्रा एक्सयुव्ही क्र एमएच २७-डीयु-०३२९ गाडी फिचे गाडीसमोर येवून थांबली.त्यामधुन अमर शिरभाते त्याचे हातात पीयुसी पाईप घेवून फिस व त्याचे मावस भावास मारु लागले व शिवीगाळ करुन मारण्याच्या धमक्या देवू लागले. अशा फिर्यादीचे बयानावरुन सदर गुन्हा दाखल |
| १० | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र. २१/२५ कलम २९६, ११५(२), ३५१(२) ३५२ भान्यंसं | वेलकम टी पॉईंट अमरावती | दि. ०८.०१.२५ चे ०२.३० वा. दाखल दि. ०८.०१.२५ चे ०६.२८ वा. | अमर ओमप्रकाश शिरभाते वय ३९ रा. कल्याण नगर गल्ली नं १ अमरावती | सार्थक विजय अमदरे वय २४ रा असराणी ले आऊट मोर्शी ता जि अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना तावेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे गाडी महेंद्रा एक्सयुव्ही क्र एमएच २७-डीयु-०३२९ ने त्यांचे हॉटेल बंद करुन त्यांचे मित्रासह घरी जाण्यास निघाले असता .मागुन येणाऱ्या वॅगनॉर गाडी क्र एमएच २७बीई-३४१४ ने वेलकम टी पॉईंट जवळ येवून कॉर्नरला थांबली ती गाडी फिर्यादीचे गाडीचा पिछा करीत आहे म्हणून गाडी जवळ जावून त्याला विचारले असता सदर इसम आमचे बार मध्ये दारु पिण्याकरीता आला व आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अप क्र २६/२५ कलम १२अ) मजुका | दि.०८.०१.२०२५ चे १५.०० वा | दि.०८.०१.२०२५ चे १९.१० वा | पोहेका संजय भिलये ब नं १२१२ पो स्टे गाडगे नगर अमरावती | प्रशांत बुधाराम मेश्राम वय ४२ वर्ष रा दस्तुर नगर अमरावती | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टॉपसह हजर असतांना खबरीवरुन पोस्टे सह जुगार रेड केला असता आरोपी हा अवेदयरित्या टिव्हीवर ऑनलाईन चक्री या जुगारवर लोकाकडुन पैसे घेवुन जुगार खेळतांना मिळुन आले आरोपीचे ताव्यातुन एक जुना वापरता टि व्ही आय सिरीज कंपनीचा कि अं १००००/- रु चा २.जिओ कंपनी वायफाय बॉक्स कि अं ३०००/- रु ३.मॅक्सिकॉम टि व्ही बॉक्स व केबल व अडाप्टर अटॅच असलेला कि अं १०००/- रु ४.जुने वापरते दोन रिमोट कि अं कि १००/- रु.५.जुने वापरते डेल कं चे किबोर्ड कि अम ५००/- रु. ६.भिम ॲप स्कॅनर व फोन पे व्हाईस मशीन कि अं ५००/- ७.पिवळ्या थैलीमध्ये असलेले ६०० रु रोख असा एकुन जु की १५१००/- रु चा माल पंचासमक्ष जप्त करुन नमुद आरोपीवर सदरचा गुन्हा नोंद |

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | पो स्टे गाडगे नगर अमरावती | अप क्र २३/२५ कलम ६५ (ई) मदाका | दि.०८.०१.२०२५ चे १२.३० वा | दि.०८.०१.२०२५ चे १७.४१ वा | पोहेका जावेद अहमद ब नं १०२२ पो स्टे गाडगे नगर अमरावती | एक महिला | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे पो स्टॉपसह हजर असतांना खबरीवरुन पोस्टे सह प्रोव्हीशन रेड केला असता आरोपी ही विना परवाना घरासमोर प्लास्टिक पिशवीमध्ये दारु विक्री करित असताना दिसुन आली तिचे ताव्यातुन २४ नग देशी दारु बॉबी संत्रा च्या सिलबंद काचेच्या बॉटल कि अं १६८०/- रु व २० नग टँगो पंच कं देशी दारुच्या काचेच्या बॉटल कि अं १४००/- रु असा एकुण प्रोव्हीशन की ३०८०/- असा मिळुन आला. ंचासमक्ष जप्त करुन नमुद आरोपीवर सदरचा गुन्हा नोंद |